महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिर्वतन (SMART) प्रकल्पाकरिता स्थापण्यात येणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी ३७ नवीन पदांच्या निर्मितीस मंजूरी प्रदान करणे.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक :- कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१२९/८-अे,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०१९.

संदर्भ:

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दि. २४/०७/२०१८

२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. कृव्यप्र - ४६१८/प्र.क्र.१०२/८-अे, दि.१९/०१/२०१९

प्रस्तावना:

दिनांक ८.०१.२०१९ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये जागतिक बँक (IBRD) अर्थसहाय्यित "महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) हा सुमारे रु.२२२० कोटी (३०० दशलक्ष डॉलर) गुंतवणूकीचा प्रकल्प ६ वर्षे कालावधीकरिता राबविण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा आराखडा (Project Implementation Plan) तयार करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळासह प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याकरिता प्रथम टप्प्यात प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये पूर्ण वेळ ३७ पदांची (१४ शासकीय व २३ कंत्राटी) कृषि आयुक्तालयाच्या आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात निर्मिती करण्यास मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केली असून त्यानुसार संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

मंत्रीमंडळाच्या मान्यतेच्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये ३७ नवीन पदांच्या निर्मितीस मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर सचिव समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेनुसार महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे कार्यालय आयुक्त (कृषि) यांच्या अधिपत्याखाली ३७ पदांसह पुणे येथे कार्यान्वीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

शासन निर्णय:

१. महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाचा आराखडा (PIP) तयार करण्यासाठी आयुक्त (कृषि) यांच्या अधिपत्याखाली प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (PMU) पुणे येथे स्थापना करण्यात यावी.

२. या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये प्रकल्प कालावधीपर्यंत कृषि आयुक्तालयाच्या आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात पुढील पूर्णवेळ ३७ पदांच्या (१४ शासकीय व २३ कंत्राटी) निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे :

अ. क्र.	पदनाम	नियुक्ती प्रकार (संवर्ग पदे/प्रतिनियुक्तीची पदे / कंत्राटी पदे)	वेतन (६व्या वेतन आयोगानुसार) / ठोक वेतन	मंजूर पद संख्या
१	प्रकल्प संचालक	आयुक्त (कृषि) / भा.प्र.से. संवर्ग पद	अनुज्ञेयतेप्रमाणे	१
२	अतिरिक्त प्रकल्प संचालक	संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ)	रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे ७६००)	१
३	वित्त विशेषज्ञ	संवर्ग पद (उप संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट - अ)	रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००)	१
४	धोरण विश्लेषक	संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ)	रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००)	१
५	संनियंत्रण व मुल्यमापन तज्ज्ञ	संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ)	रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००)	१
६	प्रशासकीय अधिकारी	मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातून प्रतिनियुक्तीने	रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे ५४००)	१
७	तंत्र अधिकारी	संवर्ग पद (महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब)	रु.९३००-३४८०० (ग्रेड पे ४६००)	४
८	लेखाधिकारी	संवर्ग पद (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट - ब)	रु.९३००-३४८०० (ग्रेड पे ४६००)	२
९	सहाय्यक लेखाधिकारी	संवर्ग पद (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट - क)	रु.९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००)	२
१०	कृषि-व्यवसाय मुल्य साखळी तज्ज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
११	पणन विश्लेषक	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१२	पशुधन व दुग्धव्यवसाय तज्ज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१३	प्रापण तज्ज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१४	माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापक	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१५	उदयोजक विकास सह संसाधन निर्मिती विशेषज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१६	सामाजिक विकास विशेषज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१७	पर्यावरण विशेषज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/-पर्यंत ठोक	१
१८	एम.आय.एस.विशेषज्ञ	कंत्राटी	रु.२,००,०००/- पर्यंत ठोक	१
१९	सहयोगी विषय तज्ज्ञ	कंत्राटी	रु.६०,०००/- पर्यंत ठोक	७
२०	सहाय्यक	कंत्राटी	रु.४०,०००/- पर्यंत ठोक	७
		एकूण		**३७**

३. महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाच्या पुढील टप्प्याकरिता आवश्यक पदे वित्त विभागाच्या मान्यतेने भरण्यास यथावकाश मंजूरी देण्यात येईल.

४. प्रकल्प मंजुरीनंतर आयुक्त (कृषी) अथवा भारतीय प्रशासन सेवेतील पूर्ण वेळ स्वतंत्र अधिकारी महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाचे प्रकल्प संचालक म्हणून नियुक्त करण्यात येतील.

५. परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केलेल्या ३७ पदांपैकी अ. क्र. १ ते ९ येथे नमूद केलेली १४ पदे शासनाच्या विविध विभागातील शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची संवर्ग पदे म्हणून घोषित करण्यात येत असून या पदांवर त्या - त्या विभागांनी अधिकारी / कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. या पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाचे अधिकारी / कर्मचारी नियमितपणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, उपरोक्त तक्त्यात संवर्ग पदे म्हणून नमूद केलेली सर्व पदे संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आकृतीबंधात संवर्ग पदे म्हणून प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समावेश करावीत.

६. परिच्छेद क्र. २ मधील तक्त्यात नमूद केल्यानुसार, प्रकल्प व्यवस्थापन कक्षांतर्गत निर्माण करण्यात आलेली अ. क्र. २, ४ व ५ येथील पदे महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी गट - अ संवर्गातील पदे म्हणून, आणि अ. क्र. ७ येथील पदे महाराष्ट्र कृषि सेवा गट - ब संवर्गातील पदे म्हणून कृषि विभागाच्या अधिनस्त कृषि आयुक्तालयाच्या आकृतीबंधामध्ये संवर्ग पदे म्हणून प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समाविष्ट करावीत.

७. अ.क्र. ३ येथील पद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट - अ (उप संचालक) संवर्गातील पद म्हणून, अ.क्र. ८ येथील पदे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा कृषि अधिकारी गट - ब संवर्गातील पदे म्हणून, आणि अ. क्र. ९ येथील पदे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा कृषि अधिकारी गट - क संवर्गातील पदे म्हणून वित्त विभागाच्या अधिनस्त लेखा व कोषागारे संचालनालयाच्या आकृतीबंधामध्ये संवर्ग पदे म्हणून प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समाविष्ट करावीत.

८. त्याचप्रमाणे, अ. क्र. ६ येथील पद मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातून प्रतिनियुक्तीने भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने करावी.

९. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन यांनी अ.क्र. १० ते २० येथे नमूद केलेली २३ पदे वेळोवेळी आवश्यक कालावधीकरिता बाहयस्त्रोत यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने प्रकल्प कालावधीपर्यंत आवश्यकतेनुसार भरावीत.

१०.सद्य:स्थितीत प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये एकूण ३७ पदांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली असून या पदांपैकी १४ पदे विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती वा प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. या पदांकरिता संबंधित प्रशासकीय विभागातून संवर्ग पदावरील अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होत नसल्यास, सदर पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कंत्राटी तत्वावर आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

११.त्याचप्रमाणे, प्रकल्प संचालकांना आवश्यकता वाटल्यास, प्रकल्पाकरिता निर्माण केलेल्या वरिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे पद अवनत करुन त्या पदावर संबंधित प्रशासकीय विभागातील लगतच्या वेतन श्रेणीतील कनिष्ठ पदांवरील अधिकारी / कर्मचारी नियुक्त करण्याची देखील मुभा राहिल.

१२.महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाकरिता मंजूर केलेली उपरोक्त ३७ पदे प्रकल्प कालावधीपर्यंत कृषि विभागाच्या अधिनस्त कृषि आयुक्तालयाच्या आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात निर्माण करण्यात येत असून प्रकल्पाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर पदे आपोआप निरसीत होतील.

१३.सदर प्रकल्पांतर्गत बाहयस्त्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर भरण्यात येणारी पदे केवळ प्रकल्प कालावधीपर्यंतच अस्तित्वात राहतील. प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर कंत्राटी तत्वावर नियुक्ती दिलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा देखिल संपुष्टात येतील व कोणत्याही परिस्थितीत त्यांचा शासकीय सेवेत समावेश करण्यात येणार नाही. प्रकल्प संचालकांनी संबंधितांशी करारनामा करतेवेळी याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासनावर कोणतेही दायित्व निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४.सदर शासन निर्णय उच्चस्तर सचिव समितीने पद निर्मितीस चक्रीय पध्दतीने दिलेल्या मान्यतेनुसार तसेच,वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९२/ आपुक, दिनांक १५/०३/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१५.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१३१७५३१२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0ff faa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a 95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.05.28 13:21:19 +05'30'

(श्रीकांत आंडगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
२. मा.मंत्री (कृषि व फलोत्पादन),कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा / विधानपरिषद,विधानभवन,मुंबई
४. मा.राज्यमंत्री (कृषि),कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
५. सर्व संसद सदस्य / महाराष्ट्र विधानसभा सदस्य / महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (पदुम व पणन), मंत्रालय, मुंबई

१०.प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
१५.आयुक्त (कृषि), तथा प्रकल्प संखचालक,महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन, कृषि आयुक्तालय, पुणे.
१६.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७.आयुक्त सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८.विभागीय आयुक्त (सर्व)
१९.जिल्हाधिकारी (सर्व)
२०.विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२१.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२२.प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई
२३.प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन, पुणे
२४.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५.व्यवस्थापकीय संचालक, ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन, मुंबई
२६.व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
२७.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ, मुंबई
२८.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई
२९.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
३०. उप सचिव (आस्था), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
३१.उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
३२.महालेखापाल,महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
३३.अधिदान व लेखा अधिकारी, ममुंबई,
३४.निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,
३५.वित्त विभाग (व्यय १ / आपुक), मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
३६.नियोजन विभाग (कार्यासन १४३१),मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
३७.कक्ष अधिकारी,कार्यासन क्रमांक- २ अे कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई,
३८.निवड नस्ती.